# जिल्हा परिषद, वर्धा
## सामान्य प्रशासन विभाग
सिव्हील लाईन, वर्धा
दुरध्वनी क्र. ०७१५२-२४३८८९/२४३२११
ई-मेल - dyceogenzpwardha@gmail.com


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पत्र क्र/जिपव/साप्रवि/आस्था-६/अनुकंपा/वशि ४७/२०२५ दिनांक :- १५ जुलै, २०२५.

अनुकंपा अंतरीम ज्येष्ठता यादी दि. ०१.०७.२०२५

प्रती,

---------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

**विषय :- अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळणेबाबत उमेदवारांनी केलेल्या अर्जाची अंतरीम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

**संदर्भ :- १. म.शा. सा.प्र.वि. शासन परिपत्रक क्र. अकंपा/१२२१/प्र.क्र.१८६/का-८, दि. २६ ऑगस्ट, २०२१.**
**२. म.शा. सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. अकंपा/१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दि. २१ सप्टेंबर, २०१७.**
**३. म.शा. सा.प्र.वि. शासन निर्णय क्रमांक अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२०४/आठ, दि.२२ ऑगस्ट, २००५.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, ज्या कर्मचाऱ्यांचा जिल्हा परिषद सेवेत असतांना अकाली मृत्यु होतो अशा कर्मचाऱ्यांच्या कुटूंबाची वाताहात होऊ नये म्हणुन शासनाने अशा कुटूंबांचे पालन पोषणाकरीता ज्या कुटूंबातील इतर कोणीही पालन पोषण करण्यासाठी सक्षम नाही किंवा शासकीय सेवेत नाही अशाच कुटूंबातील एका व्यक्तीस अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्याची शासनाची भुमिका आहे. अशा जिल्हा परिषद सेवेत असतांना मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकांसाठी अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळणेबाबत केलेल्या अर्जाची ज्येष्ठता यादी (प्रतिक्षासूची) प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. सोबतच्या यादीत **३० जून, २०२५ पर्यंत** अनुकंपा तत्त्वावर विहीत मुदतीत नोकरी मिळणेकरीता प्राप्त झालेल्या परिपूर्ण अर्जाचा ज्येष्ठता यादीत समावेश केला आहे.
२. सदर ज्येष्ठता सुचीत अनुक्रमांक **०१ ते १०** पर्यंत दर्शविलेली माहीती बरोबर असल्याची खात्री करण्यात यावी, त्यात काही चुका किंवा सुधारणा असल्यास पुराव्यासह **दिनांक - २५/०७/ २०२५** पर्यंत आक्षेप नोंदवावा.
३. सदर ज्येष्ठता सुचीतील काही रकान्यातील माहिती सुधारीत करावयाची असल्यास किंवा शैक्षणिक पात्रतेत वाढ करावयाची असल्यास तशी लेखी माहिती **दिनांक - २५/०७/ २०२५** पर्यंत सादर करावी. तसेच आपणास वेळोवेळी प्राप्त होणारे शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र सुध्दा सादर करावेत.
४. सध्या प्रचलीत असलेल्या नियमाप्रमाणे वेळोवेळी एका वर्षामध्ये जिल्हा परिषदेमध्ये रिक्त होणाऱ्या जागांच्या २०% पदे ही सदर प्रतिक्षासूचीमधील भरण्यात येईल.
५. कर्मचारी मृत्यु झाल्यापासून ०१ वर्षाच्या आंत अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळणेबाबत परिपूर्ण अर्ज संबंधित विभाग प्रमुखाकडे किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वर्धा यांचे नावे केला पाहीजे.
६. अनुकंपा तत्त्वावर नोकरी मागणारा उमेदवार अल्पवयीन म्हणजेच १८ वर्षाच्या आत असला तरी त्याला किंवा त्याच्या कुटूंबातील सदस्यांना कर्मचारी मृत्यू झाल्यापासून ०१ वर्षाच्या आंत अर्ज सादर करावयाचा आहे. वयाची १८ वर्ष पूर्ण व प्रस्ताव परिपूर्ण झाल्यानंतर परिपूर्ण प्रस्ताव प्राप्तीचे दिनांकापासून प्रतिक्षा यादीत नाव समाविष्ठ करण्यात येईल.
७. उमेदवार अल्पवयीन असेल व त्याने ०१ वर्षाचे आंत अर्ज सादर केला असेल तरी तो अनुकंपा तत्त्वावर नोकरीसाठी वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्यावरच पात्र होईल व वयाचे ४५ वर्ष होईपर्यंत त्यास अनुकंपा तत्त्वावर

नोकरीत सामावुन घेता येईल.त्यानंतर मात्र वयाची ४५ वर्ष पुर्ण केलेल्या यादीतील उमेदवारांचे प्रकरण नस्तीबध्द केल्या जाईल. वयोमर्यादेत शासनाने वाढ केल्यास त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

८. शासन निर्णय क्र.अकंपा-१०१४/प्र.क्र.१६४/आठ, दि. २० मे, २०१५ मधील मुद्दा क्रमांक ०१ चे क नुसार कर्मचाऱ्याच्या मृत्युनंतर त्याच्या पात्र कुटूंबीयाचे नाव अनुकंपा धारकाच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेतल्यानंतर त्याचेऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नाव प्रतीक्षासूचीमध्ये घेतले जात नाही. म्हणजेच प्रतीक्षासूचीमधील नाव बदलण्याची तरतुद सध्याच्या धोरणात नाही. परंतु प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचेच निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटूंबातील अन्य पात्र उमेदवाराचे नांव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मुळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील मुळ दिनांकाला घेतल्या जाईल.

९. ज्या कर्मचाऱ्याचे स्वत:चे कुटूंब नाही त्या कर्मचाऱ्याचे भाऊ किंवा बहिण अशा कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास त्याच्यावर अवलंबुन असलेल्या अशा बहिण किंवा भावाला अनुकंपा तत्त्वावर नोकरीकरीता अर्ज सादर करता येईल. मात्र त्याकरीता अशी बहिण किंवा भाऊ मृत्यु झालेल्या कर्मचाऱ्यावर अवलंबून असल्याबाबतचे पुरावे सिध्द करून सादर करावे लागतील.

१०. कुटूंबातील कर्ता मृत्यु पावल्यामुळे व त्या कुटूंबात दुसरा कोणीही वारस शासकीय सेवेत नसल्याने कुटूंबाची वाताहात होऊ नये म्हणून फक्त एका व्यक्तीस अनुकंपा तत्त्वावर नोकरी द्यावयाची आहे. त्याकरीता तसे शपथपत्र (प्रतिज्ञापत्र) सादर करावयाचे आहे. दिलेली माहिती खोटी निघाल्यास उमेदवाराला लागलेली नोकरी गमवावी लागेल व त्याच्यावर फौजदारी खटला चालविला जाईल, याची नोंद घ्यावी.

११. सदर प्रतीक्षासूची जिल्हा परिषदेच्या www.zpwardha.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच जिल्हा परिषद, वर्धा (मुख्यालय) व सर्व पंचायत समित्यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

१२. सदर ज्येष्ठता सूचीत काही बदल नोंदवायचे असल्यास किंवा शैक्षणिक कागदपत्र सादर करावयाची असेल त्यांनी दिनांक २५/०७/ २०२५ पुर्वी सादर करावे. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही व अंतीम प्रतीक्षासूची प्रसिध्द करण्यात येईल.

सहपत्र :- अनुकंपा अंतरीम प्रतिक्षासूची दि. ०१.०७.२०२५

एकुण पृष्ठ ०१ ते ३

Parag Soman.

(पराग सोमण, भा.प्र.से.)

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद, वर्धा

प्रतीलीपी :-

१. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा.
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, वर्धा.
४. ------------------------------------------------------------ (खाते प्रमुख), जि.प. वर्धा.
५. गट विकास अधिकारी / गट शिक्षणाधिकारी, पं.स. -------------------------- यांना माहितीस्तव अग्रेषित.
६. बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो. प्रकल्प ---------------------- यांना माहितीस्तव अग्रेषित.
७. मुख्याध्यापक, महात्मा गांधी विद्यालय, जि.प. वर्धा/जिल्हा परिषद कन्या शाळा, आर्वी यांना माहितीस्तव अग्रेषित.

**यासोबत संलग्न करण्यात आलेली अनुकंपा प्रतीक्षासूची आपण आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर त्वरीत प्रसिध्द करून संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या वारसांच्या निदर्शनास आणुन द्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.**

Parag Soman.

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद, वर्धा

जिल्हा परिषद, वर्धा

सामान्य प्रशासन विभाग

## अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याकरीता असलेली उमेदवारांची अंतरीम प्रतिक्षा यादी.

## दि. ०१.०७.२०२५ ची स्थिती

| अ.क्र./ अनुकंपा रजिस्टर क्रमांक | अर्जदाराचे संपूर्ण नाव | दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | दिवंगत झाल्याचा दिनांक | अर्जदाराचे दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांशी नाते | अर्ज प्राप्त झाल्याचा आवक क्र. व दिनांक | अर्जदाराची जन्म तारीख | जात व प्रवर्ग | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १/३१६ | श्रीमती लक्ष्मी सागर घोळसे, रा. प्लॉट नं. ३२ गजानन मंदिर जवळ, हुडकेश्वर बु. नागपूर-३४ | दिवंगत श्री. सागर पळसराम घोळसे, ग्रामसेवक, पंचायत समिती, समुद्रपूर जि. प. वर्धा | २८.११.२०२३ | पत्नी | १२७६३<br>२६.१२.२०२३ | ०५.०५.१९८७ | माळी / इ.मा.व. | १० वी, १२ वी (५६.५०%) बी.ए. डी.एड. MS-CIT | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. १४०१ दि. १५.०२.२०२४ |
| २/३१९ | श्रीमती विद्या प्रमोद ढोले, रा. नंदोरी रोड, महाकाली नगरी, संत तुकडोजी वार्ड, हिंगणघाट ता . हिंगणघाट जि . वर्धा | दिवंगत श्री. प्रमोद हरीचंद्र ढोले, सहायक शिक्षक, जि.प. शाळा बोपापूर पं.स. हिंगणघाट जि.प. वर्धा | ०१.०९.२०२३ | पत्नी | ३८०७<br>०६.०५.२०२४ | ०५.०७.१९८१ | धनगर / भ.ज. क | १० वी, १२ वी (४७%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ३८०७ दि. ०६.०५.२०२४ |
| ३/३२० | श्री. उमाकांत किशोर महारे, रा. वायगांव (निपानी) ता. वर्धा जि. वर्धा | दिवंगत श्री. किशोर गोविंदराव महारे, शिक्षक, पंचायत समिती, हिंगणघाट | २९.०८.२०१७ | मुलगा | ३८०८<br>०६.०५.२०२४ | २६.१०.२००४ | गोवारी / वि.मा.प्र. | १० वी, १२ वी (४७.६७%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ३८०८ दि. ०६.०५.२०२४ |
| ४/२५२ | कु. स्वरांगी राजू विपूलवार, रा. तुळजाभवानी मंदिर जवळ, सर्कस ग्राऊंड, रामनगर, वर्धा ता. जि. वर्धा | दिवंगत श्री. राजू भिमाशंकर विपूलवार, सहा. शिक्षक, पंचायत समिती, समुद्रपूर जि.प. वर्धा | २८.०२.२०२१ | मुलगी | ३५३७<br>०८/०४/२०२१ | २६.०४.२००५ | कासार / इ.मा.व. | १० वी, १२ वी (६१.३३%), MS-CIT, टायपिंग मराठी-३०/४०, इंग्रजी ३०/४० | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ४७७६ दि. ०४.०६.२०२४ |
| ५/३१५ | कु. सृष्टी संदिप गेडाम, रा. धारणे चक्की जवळ, संत ज्ञानेश्वर नगर, मसाळा पो. नालवाडी ता. जि. वर्धा | दिवंगत श्री. संदिप जानबाजी गेडाम, सहा. अध्यापक, पंचायत समिती, सेलू जि.प. वर्धा | १९.०९.२०२३ | मुलगी | १३२३<br>१४.०२.२०२४ | ०६.०९.२००१ | गोंड / अनु. जमाती जात वैधता प्राप्त | १२ वी (६२.९२%), Diploma & Degree in Pharmacy | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ४८५१ दि. ०६.०६.२०२४ |
| ६/३१७ | श्री. आयुष सतिश शाहाकार, रा. वार्ड क्र. ०२, गिरी (मेघे) ता. जि. वर्धा | दिवंगत श्रीमती आरती सतिश शाहाकार, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जि.ग्रा.वि.यं. वर्धा जि.प. वर्धा | ०९.१२.२०२३ | मुलगा | २३६०<br>१३.०३.२०२४ | १४.०७.२००२ | जैन / खुला | १२ वी (७४%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ५६४६ दि. ०१.०७.२०२४ |

| अ.क्र./ अनुकंपा रजिस्टर क्रमांक | अर्जदाराचे संपूर्ण नाव | दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | दिवंगत झाल्याचा दिनांक | अर्जदाराचे दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांशी नाते | अर्ज प्राप्त झाल्याचा आवक क्र. व दिनांक | अर्जदाराची जन्म तारीख | जात व प्रवर्ग | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ७/३२४ | कु. पल्लवी कविश्वर जारुंडे, रा. चिंतामणी नगर, देवळी ता. जि. वर्धा | दिवंगत कविश्वर ऋषीजी जारुंडे, सहायक शिक्षक, पंचायत समिती, देवळी | ०२.०२.२०२३ | मुलगी | ५११५ ०५.०७.२०२४ | ०७.०८.१९९२ | महार / अनु. जाती ना.वै. | बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स & कॉम्युनिकेशन १२ वी (७२.८३%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ५११५ दि. ०५.०७.२०२४ |
| ८/३२५ | कु. मिनल प्रमोद पाटील, रा. गोकुल सिटी, नविन दाभा, कारंजा (घा.) ता. कारंजा जि. वर्धा | दिवंगत प्रमोद पुंडलीक पाटील, पशुधन पर्यवेक्षक, पशुवैद्यकीय दवाखाना, तारासावंगा पं.स. आष्टी जि.प. वर्धा | १२.१०.२०२३ | मुलगी | ६१५२ ०५.०७.२०२४ | ०४.०४.२००१ | महार / अनु. जाती जात वैधता प्राप्त | १२ वी (५६.४६%) MS-CIT | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ६१५२ दि. ५.०७.२०२४ |
| ९/३२६ | श्री. आशिष संजय लवडे, रा. साई नगर, डोनकर लेआऊट, वर्धा ता. जि. वर्धा | दिवंगत संजय पांडुरंग लवडे परिचर, पंचायत समिती, आर्वी | ३१.०५.२०२४ | मुलगा | ७४०० १२.०८.२०२४ | २६.०६.१९९१ | कुणबी / इ.मा.व. | पदविका व पदवी (Computer Engineering), MS-CIT, १२ वी (५६.६७%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ७४०० दि. १२.०८.२०२४ |
| १०/२७६ | कु. ईशा गजानन खोड, रा. हनुमान मंदीर जवळ, बागुल लेआऊट, मसाळा ता. जि. वर्धा | दिवंगत गजानन रामदासजी खोड, सहा. शिक्षक, पं.स. आर्वी | २४.०५.२०२१ | मुलगी | ८९ ०५.०१.२०२२ ११.१०.२०२१ | ०१.१२.२००० | तेली / इ.मा.व. | १२ वी (९०.४६%), पदवी. बी.ए.एम.एस.बी MS-CIT | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ८५७७ दि. १८.०९.२०२४ |
| ११/२४० | कु. विधी नरेंद्र कापकर, रा. राधाकृष्ण नगर, प्लॉट नंबर. ३०४, पाहोडा लेआऊट, पांडे किराणा स्टोअर्स जवळ, नागपूर | दिवंगत नरेंद्र कापकर, शिपाई, प्रा.आ.केंद्र, नंदोरी पं.स. समुद्रपूर जि.प. वर्धा | २८.१२.२०१९ | मुलगी | २११९२ १३.११.२०२० | ३०.०४.२००६ | वंजारी / भ.ज. ड | १२ वी (४८.८३%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ३५१३०३४ दि. १६.१२.२०२४ |
| १२/३२७ | श्री. साक्षात विवेक पेंडके, रा. विठ्ठल मंदिर वार्ड, जुनी वस्ती हिंगणघाट जि. वर्धा | दिवंगत विवेक मुरलीधर पेंडके, वरिष्ठ सहायक, शिक्षणविभाग, पं.स. हिंगणघाट जि. प. वर्धा | ०६.०१.२०२५ | मुलगा | १०७१ ०४.०२.२०२५ | २०.०१.२००१ | ब्राह्मण / खुला | १२ वी (५५.०८%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. १०७१ दि. ०४.०२.२०२५ |

| अ.क्र./ अनुकंपा रजिस्टर क्रमांक | अर्जदाराचे संपूर्ण नाव | दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | दिवंगत झाल्याचा दिनांक | अर्जदाराचे दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांशी नाते | अर्ज प्राप्त झाल्याचा आवक क्र. व दिनांक | अर्जदाराची जन्म तारीख | जात व प्रवर्ग | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १३/३२८ | श्री रुपेश गजानन इजापुरे, रा. दाते सभागृह समोर, लड्डा ले आउट रघुजी नगर पिपरी मेघे, मानस मंदिर वर्धा. | दिवंगत गजानन पुंडलीकराव इजापुरे, सहाय्यक अध्यापक, जि. प.उ.प्रा.शाळा, झाडगाव पं. स. वर्धा, जि. प. वर्धा | १८.१०.२०२४ | मुलगा | ३४३०<br>०९.०४.२०२५ | ०३.१०.१९९७ | गवळी / भ.ज. (ब.) | पदवी (पत्रकारीता व जनसंचार), पदव्युत्तर पदवी (एम.ए. - Advert. & Public Relation) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ३४३० दि. ०९.०४.२०२५ |
| १४/३२९ | कु. मानसी मनोहर उमरे, रा वडनेर ता. हिंगणघाट जि. वर्धा | दिवंगत मनोहर केशव उमरे, ग्रामसेवक, पंचायत समिती, हिंगणघाट जि. प. वर्धा | ०४.०३.२०२५ | मुलगी | ४३६३<br>०८.०५.२०२५ | २२.०४.२००६ | महार / अनु. जाती | १२ वी (५७%) | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त आ.क्र. ४३६३ दि. ०८.०५.२०२५ |

(अमोल भोसले)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य)
जिल्हा परिषद, वर्धा

(पराग सोमण, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा